GOVERNMENT OF MAHARASHTRA

# जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर

शासकीय दूध डेअरी शेजारी, सात रस्ता सोलापूर - ४१३००३

**महसूल शाखा - जिल्हा नियंत्रण कक्ष**

दूरध्वनी क्र. : (0217) - 2731020
फॅक्स क्र. : (0217) - 2621120

Email ID : collectorsolapur@gmail.com
Email ID : rdcsolapur@gmail.com
Email ID : ddmo.rfsol-mh@gov.in


जा.क्र. २०२३/मशा/कार्या-४/नैआ/जिनिक/प्र.क्र.११६/आरआर- 2098 दिनांक:-२९/११/२०२३

**अत्यंत महत्वाचे / अतितात्काळ**

प्रति,

१. **जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,सोलापूर**
२. **सर्व तहसिलदार**
उत्तर सोलापूर / बार्शी / दक्षिण सोलापूर / अप्पर मंद्रुप / अक्कलकोट / मोहोळ / माढा / करमाळा/ पंढरपूर / सांगोला / मंगळवेढा / माळशिरस

**विषय- अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांचे नुकसानीचे पंचनामे करणेबाबत.**

**संदर्भ-** १. मा.उपसचिव, महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक सीएलएस-२०२३/प्र.क्र.२६०/म-३ दिनांक २८/११/२०२३
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दिनांक २७ मार्च २०२३

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविणेत येते की, मा.उपसचिव, महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडिल संदर्भ क्र.१ चे पत्रान्वये दि.२६ ते २८ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत राज्यातील काही जिल्ह्यामध्ये अवेळी पाऊस / वादळीवारे व गारपिटीमुळे शेतीपिके / फळपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ज्या जिल्ह्यात अवेळी पाऊस / गारपीट झाली आहे अथवा यापुढे होईल त्या जिल्हयातील शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे विहीत कार्यपध्दतीनुसार तातडीने करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

त्यानुसार दि.२६ ते २८ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ज्या तालुक्यामध्ये अवेळी पाऊस / गारपीट झाली आहे अथवा यापुढे होईल त्या तालुक्यातील शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे विहीत कार्यपध्दतीनुसार करणेत यावे. व ३३% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानी प्रकरणी बाधित शेतक-यांना संदर्भ क्र-२ अन्वये शासन निर्णयात विहीत केलेल्या दराने आर्थिक मदत देण्यासाठी आवश्यक असलेल्या मदतीचा सविस्तर प्रस्ताव प्रपत्र अ,ब,क,ड व Annexure-१ मध्ये तहसिलदार, गटविकास अधिकारी पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावा. सदरची माहिती शासनास सादर करावयाची असल्यांने यात विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच सदरची माहिती व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

29/11/2023

( दादासाहेब कांबळे )
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**सोलापूर**